**<u>ठळक बातम्या</u>**

- एक देश एक निवडणूक विषयीचं एक विधेयक केंद्रीय कायदेमंत्र्यांनी केलं लोकसभेत सादर
- भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यसभेतल्या चर्चेला आज पुन्हा सुरुवात
- राजस्थानात भाजपा सरकार स्थापनेच्या वर्षपूर्ती निमित्त प्रधानमंत्र्यांच्या हस्ते ४६ हजार ३०० कोटी रुपये खर्चाच्या २४ प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण
- महाराष्ट्र विधानसभेत तालिका सदस्यांची नियुक्ती / विधानपरिषदेत सभापतीपदाची निवडणूक येत्या गुरुवारी होणार

**आणि**

- बॉर्डर - गावस्कर चषक क्रिकेट कसोटी मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारताला फॉलो ऑन टाळण्यात यश

**<><><><><>**

एक देश एक निवडणूक संदर्भातली विधेयकं लोकसभेत मांडण्याची प्रक्रिया सुरू आहे. केंद्रीय कायदे मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी लोकसभेत संविधान दुरुस्ती विधेयक २०२४ आणि केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक २०२४ सभागृहात सादर करण्याचा प्रस्ताव मांडला. त्या प्रस्तावाला काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पार्टी, द्रमुक, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि इतर विरोधी पक्ष सदस्यांनी विरोध केला. हा संविधानाच्या

मूलभूत रचनेवर हल्ला असल्याची टीका करत विरोधकांनी ही विधेयकं पुढच्या छाननीसाठी संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याची मागणी केली.

**<><><><><>**

एक देश एक निवडणूक विधेयकाला काँग्रेस, समाजवादी पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीच्या सदस्यांनी विरोध केला आहे. संसदेच्या आवारात प्रसारमाध्यमांशी बोलताना विविध पक्षांच्या खासदारांनी याबाबत प्रतिक्रीया दिल्या.  एक देश एक निवडणूक विधेयकाला आपल्या पक्षाचा विरोध असून सभागृहात मांडण्यापूर्वी हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे छाननीसाठी पाठवावं अशी पक्षाची मागणी असल्याचं ज्येष्ठ काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी सांगितलं.राष्ट्रवादी कांग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांनी देखील अशीच मागणी केली.  हे विधेयक असंवैधानिक असून राज्यांचं महत्त्व कमी करणारं असल्याचा आरोप स. पा. चे धर्मेंद्र यादव यांनी केला. तर हे विधेयक संघराज्याच्या तत्वांच्या विरोधात असल्याचं सीपीआय एम चे जॉन ब्रिटास यांचं म्हणणं आहे.

**<><><><><>**

एक देश एक निवडणूक हा देशासाठी एक महत्त्वाचा मुद्दा असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथे आज ते वार्ताहरांशी बोलत होते. हा मुद्दा कोणत्याही पक्षासाठी किंवा कोणत्याही व्यक्तिसाठी नसून तो देशाच्या हितासाठी आहे. देशात निवडणुका या देश

आणि त्या देशाच्या नागरिकांच्या हितासाठी घेतल्या जातात, असंही रिजीजू यावेळी म्हणाले. भारताला स्वातंत्र्य मिळालं तेव्हा जवळपास २० वर्षं देशात एकाच वेळी निवडणुका झाल्या. मात्र काँग्रेसने कलम ३५६चा गैरवापर केल्यामुळे संसद आणि राज्य विधानसभांच्या स्वतंत्र निवडणुका घेतल्या गेल्या, अशी टीकाही रिजीजू यांनी केली.

**<><><><><>**

शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी केंद्र सरकारने सहा कलमी कार्यक्रम तयार केला असल्याची माहिती, केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात दिली. यात उत्पादकतेत वाढ, उत्पादन खर्चात कपात, पिकांना हमीभाव, नैसर्गिक संकटग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, लागवडीत विविधता आणि सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन या मुद्द्यांचा समावेश आहे. वर्ष २००२-२००३ मधे शेतकऱ्यांचं उत्पन्न दरमहा दोन हजार ११५ रुपये होतं. ते २०१८ – १९ या वर्षापर्यंत दरमहा दहा हजार २१८ रुपयांपर्यंत पोहोचलं. त्याखेरीज शेतकऱ्यांना अल्पदराने कर्जपुरवठा, अनुदानित दराने खतं आणि यांत्रिकीकरणाला प्रोत्साहन या उपाययोजनाही करण्यात येत असल्याचं, त्यांनी सांगितलं. गेल्या वर्षभरात शेतकऱ्यांना एकूण २ लाख १४ हजार कोटी रुपये अनुदान देण्यात आलं, तर हमीभावाने विक्रमी खरेदी करण्यात आली, असं चौहान यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यसभेतल्या चर्चेला आज पुन्हा सुरुवात झाली. सभागृहाचे नेते आणि केंद्रीय मंत्री जगतप्रकाश नड्डा यांनी आपल्या भाषणात सांगितलं की भारत केवळ जगातली सर्वात मोठी लोकशाही आहे असं नव्हे तर लोकशाहीची जन्मभूमी देखील आहे. भारतीय संस्कृती आणि परिसंस्थेत स्वातंत्र्य, समता आणि समावेशन तसंच नागरिकांना सन्मानाने जगण्याची संधी ही लोकशाही तत्वं मुळापासून रुजली आहेत असं ते म्हणाले.

**<><><><><>**

गेल्या वर्षभरात राजस्थानात झालेली प्रगती ही भविष्यातल्या अनेक वर्षातल्या प्रगतीची मुहूर्तमेढ ठरली आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. राजस्थान राज्य सरकार स्थापनेला एक वर्ष झाल्याच्या पार्श्वभूमीवर जयपूर इथे आयोजित एक वर्ष परिणाम उत्कर्ष या कार्यक्रमावेळी ते बोलत होते. यावेळी मोदी यांनी ४६ हजार ३०० कोटी रुपये खर्चाच्या ऊर्जा, रस्ते, रेल्वे आणि पाणीपुरवठा या क्षेत्रातल्या २४ प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण केलं. यावेळी प्रधानमंत्री म्हणाले --

**होल्ड बाईट - नरेंद्र मोदी....**

**<><><><><>**

देशातल्या शैक्षणिक संस्थांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे. शिक्षण क्षेत्रातल्या सुधारणांसाठी  सरकारकडून करण्यात येणाऱ्या

प्रयत्नांबद्दल आज नवी दिल्ली येथे प्रसारमाध्यमांना ते माहिती देत होते. सरकारने प्रधानमंत्री पोषण योजनेअंतर्गत १ लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केली आहे, गेल्या आठ वर्षांत प्रति बालक खर्चात १३० टक्के वाढ झाली आहे.

वर्ष २०१३-१४ मध्ये १० हजार ७८० रुपये असलेली ही रक्कम आता २०२१-२२ पर्यंत २५ हजार ४३ रुपये झाली आहे, अशी माहिती धर्मेंद्र प्रधान यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी विधानसभेत तालिका सदस्य म्हणून विजय रहांगडाले, रमेश बोरनारे, शेखर निकम आणि दिलीप सोपल यांची नियुक्ती केल्याचं अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी जाहीर केलं. सभागृहाचे माजी सदस्य आणि माजी मंत्री दत्तात्रय राणे यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव अध्यक्षांनी मांडला आणि तो मंजूर झाला. तत्पूर्वी, कामकाज सुरू होण्याआधी विरोधकांनी परभणी आणि बीड इथल्या घटनांच्या निषेधार्थ विधानभवनाच्या पायऱ्यांवर सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली. विधानसभेतही विरोधक या मुद्द्यावरून आक्रमक झाले आणि स्थगन प्रस्ताव आणून या विषयावर आजच चर्चा करण्याची मागणी केली. अध्यक्षांनी ही मागणी फेटाळली आणि उद्या चर्चा घेणार असल्याचं सांगितलं. त्यामुळे विरोधकांनी सभात्याग केला. त्यानंतर औचित्याचे मुद्दे चर्चेसाठी घेण्यात आले. त्यानंतर नुकत्याच मुंबईत झालेल्या तीन दिवसीय विशेष अधिवेशनात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलेल्या

अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानणारा प्रस्ताव भाजपचे पराग अळवणी यांनी मांडला. यावर सध्या विधानसभेत चर्चा सुरू आहे.

**<><><><><>**

विधान परिषदेच्या सभापतीपदाची निवडणूक येत्या १९ तारखेला होणार असल्याची घोषणा आज सभागृहात करण्यात आली. या निवडणुकीसाठी उद्या म्हणजेच १८ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार आहेत.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर - गावस्कर चषक क्रिकेट कसोटी मालिकेतल्या ब्रिस्बेन इथं सुरू असलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात फॉलोऑन टाळण्यात  भारताला यश आलं. मात्र आज चौथ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारत पहिल्या डावात अजूनही १९३ धावांनी पिछाडीवर आहे.

आज सामन्याच्या चौथ्या दिवशी भारतानं कालच्या ४ बाद ५१ धावांवरून आपला पहिला डाव पुढे सुरू केला. मात्र  कर्णधार रोहित शर्मा पुन्हा एकदा अपयशी ठरला. केएल राहुल आणि आणि रवींद्र जडेजा यांच्या लढाऊ अर्धशतकी खेळींनी भारताचा डाव सावरला, त्यानंतर अखेरच्या गड्यासाठी जसप्रित बुमराह आणि आकाशदीप यांनी नाबाद ३९ धावांची भागिदारी करत भारताला फॉलोऑनच्या संकटातून बाहेर काढलं. अपुऱ्या प्रकाशामुळे आजच्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा भारताच्या पहिल्या डावात ९ बाद २५२ धावा झाल्या होत्या.

***//<><><><><>//***